आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

८ मे २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला / रालोआ सरकारच्या गेल्या दहा वर्षांमधल्या यशस्वी कामकाजाचं श्रेय जनतेला असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- गरिबांच्या चेहऱ्यावर हसू आणण्याचं काम नरेंद्र मोदी यांनी केलं असल्याची अमित शहा यांची प्रशंसा, तर मोदी सरकारचं धोरण शेतकरी हिताचं नसल्याची शरद पवार यांची टीका
- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ४ जागांसाठी येत्या १० जूनला मतदान
- विमान फेऱ्या रद्द झाल्याप्रकरणी नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं एअर इंडिया एक्सप्रेसकडून मागवला अहवाल

**आणि**

- इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या अध्यक्षपदावरुन सॅम पित्रोदा पायउतार

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याच्या मतदानाला अवघे पाच दिवस शिल्लक असल्यानं प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच राजकीय पक्षांचे स्टार प्रचारक सभा, बैठका, रोड शो, पदयात्रा आदींच्या माध्यमातून प्रचार करत आहेत. चौथ्या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी रालोआ सरकारच्या गेल्या दहा वर्षांमधल्या यशस्वी कामकाजाचं श्रेय जनतेला दिलं आहे. सरकारला जनतेनं दिलेल्या मतांमुळेच संरक्षण क्षेत्रात आयातदार असणारा भारत निर्यातदार बनू शकला, काश्मीरमधून तीनशे सत्तरावं कलम हटवण्यात आलं, असं त्यांनी आंध्र प्रदेशात करीमनगर इथल्या प्रचारसभेत बोलताना सांगितलं. राष्ट्र प्रथम ही भाजपाची वचनबद्धता आहे, तर कुटुंब प्रथम, हे काँग्रेस आणि भारत राष्ट्र समितीचं धोरण असल्याची टीका त्यांनी केली. हे दोन्ही पक्ष म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्यांचा भ्रष्टाचार आणि तुष्टीकरणाचं राजकारण यापासून तेलंगणाचा बचाव करण्याची गरज प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

त्वचेच्या रंगावरून केलेला जनतेचा अपमान देश सहन करणार नाही, असा इशारा प्रधानमंत्र्यांनी वरंगळ इथल्या सभेत बोलताना दिला. काँग्रेसनं पीव्ही नरसिंह राव यांच्याकडे दुर्लक्ष केलं, त्यांचा मान राखला नाही, मात्र रालोआ सरकारनं त्यांना भारतरत्न पुरस्कारानं गौरवलं, असं त्यांनी स्पष्ट केलं. राज्यातल्या अनेक योजनांमध्ये आर्थिक घोटाळा करणाऱ्या भारत राष्ट्र समितीच्या पदाधिकाऱ्यांना काँग्रेसनं पाठीशी घातलं आहे, असा आरोप त्यांनी केला. मात्र भाजपाला मत देऊन राज्याचा विकास करण्याचा पर्याय तेलंगणची जनता निवडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज जालना इथं महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गरीबांच्या चेहऱ्यावर हसू आणलं. तेच देशाला आणखी पुढे घेऊन जाऊ शकतात, असं ते या प्रचारसभेत म्हणाले. यावेळी त्यांनी सरकारच्या कामांचा आढावा घेतला. जालन्यात

केलेली विकासकामं, औरंगाबाद आणि उस्मानाबादचं नामांतर याची आठवण त्यांनी यावेळी केली. जालन्यातलं स्टील देशभरात जाण्यासाठी ड्राय पोर्ट उभं राहतंय, असं ते म्हणाले. मोदी यांच्याकडे पुढच्या २५ वर्षांचं नियोजन तयार असताना विरोधकांकडे नेता आणि धोरणं दोघंही नसल्याची टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

देशात भाजपाची सत्ता आली तर संविधान बदललं जाईल अशी अफवा विरोधक पसरवत आहेत, प्रत्यक्षात अशा कोणत्याही प्रकारे संविधान बदललं जाणार नाही असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिकमधे शिवसेना उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते. या निवडणूकीच्या निमित्तानं अल्पसंख्याकांची दिशाभूल केली जात आहे मात्र मुस्लिम समाजाला अडचण आली तरी शिवसैनिक जाऊन मदत करतील, हे सर्वसामान्यांचं सरकार असल्याने ते कायम सामान्यांसाठी धावून येईल, असं ते म्हणाले.

शिर्डी लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारासाठी एकनाथ शिंदे यांनी आज संगमनेरमधे सभा घेतली. घाट माथ्यावरचं समुद्राकडे वाहून जाणारं पाणी अडवून नाशिक आणि मराठवाड्याला देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी या सभेत सांगितलं.

**<><><><><>**

ही लोकसभा निवडणूक सामान्य माणसांच्या आशा, अपेक्षा कोण पुर्ण करु शकते, याचा फैसला करणारी असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज धुळे लोकसभा मतदार संघात भाजपाच्या उमेदवार डॉ हिना गावित यांच्या प्रचारासाठी शिरपूर इथं आयोजित विजय संकल्प मेळाव्यात बोलत होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या काळात देशातल्या सर्वच घटकांसाठी कल्याणकारी योजना राबवल्या जात असून 'सबका साथ, सबका विकास' साधला जात आहे. त्यामुळे विरोधकांकडे मुद्देच उरलेले नाहीत. म्हणून त्यांनी 'मोदी यांना ४०० जागा मिळाल्या तर ते संविधान बदलतील' असा खोटा प्रचार सुरु केला आहे. परंतु, मोदी यांच्यासाठी धर्मग्रंथांपेक्षा संविधान श्रेष्ठ आहे. चंद्र-सूर्य असेपर्यंत ते संविधान बदलणार नाहीत. उलट काँग्रेसनं इंदिरा गांधी यांच्या काळात दोन वर्षे आणीबाणी जाहीर करुन संविधान गुंडाळून ठेवलं होतं. त्याचा जाब विरोधकांनी द्यावा, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रातल्या मोदी सरकारचं धोरण शेतकरी हिताचं नसल्याची टीका शरद पवार यांनी केली आहे. ते आज अहमदनगर जिल्ह्यात श्रीगोंदा इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरद्चंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचार सभेत बोलत होते. शेतकऱ्यांच्या उत्पादित साखरेला निर्यात बंदी आहे, कांद्याला निर्यात बंदी केली जाते, गरीब शेतकऱ्यांची ही पिकं असून त्याला भाव न मिळणं हे शेतकऱ्यांच्या हिताचं नाही, असं ते म्हणाले.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार संजय राऊत, आमदार रोहित पवार, माजी आमदार राहुल जगताप उपस्थित होते.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधानपरिषदेच्या २ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघातल्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर केला. त्यानुसार मुंबई आणि कोकण विभागीय पदवीधर मतदारसंघांमध्ये तर नाशिक विभागीय आणि मुंबई शिक्षक मतदारसंघांमध्ये येत्या १० जूनला मतदान होईल.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी २२ मे पर्यंत मुदत असून २४ तारखेला छाननी होईल. २७ मे पर्यंत अर्ज मागे घेता येतील तर १३ जूनला मतमोजणी होईल.

या मतदारसंघांमधले विलास पोतनीस, निरंजन डावखरे, किशोर दराडे आणि कपिल पाटील असे चार विद्यमान सदस्य ७ जुलैला निवृत्त होत असल्यानं ही निवडणूक होणार आहे.

**<><><><><>**

नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं एअर इंडिया एक्सप्रेस कडून विमान फेऱ्या रद्द झाल्याप्रकरणी अहवाल मागवला आहे. या उद्भवलेल्या परिस्थितीतून मार्ग काढावा आणि नागरी हवाई वाहतूक संचालनालयाच्या नियमांनुसार बाधित प्रवाशांना योग्य त्या सुविधा पुरवाव्यात अशा सूचना मंत्रालयानं दिल्या आहेत. काल रात्री एअर इंडिया एक्सप्रेसचे अनेक वरिष्ठ कर्मचारी अचानक आजारपणाची रजा टाकून गैरहजर राहिल्यामुळे अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विमानफेऱ्या रद्द झाल्या होत्या.

**<><><><><>**

इंडियन ओव्हरसिस काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी अध्यक्षपद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी त्यांचा हा निर्णय स्विकारला असल्याचं काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सांगितलं. सॅम पित्रोदा यांनी देशाच्या विविध भागातल्या लोकांची तुलना इतर देशांमधल्या नागरिकांशी केली, आणि देशाच्या संस्कृती आणि अस्मितेचा अपमान केला, अशी टीका भाजपानं केली आहे. तर पित्रोदा यांचं वक्तव्य दुर्दैवी आणि अस्विकारार्ह असल्याचं काँग्रेसनं म्हटलं आहे. पित्रोदा यांचं विधान त्यांचं वैयक्तिक

मत असून काँग्रेस पक्षाचा त्याच्याशी काहीही संबंध नाही असं पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे. लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनौ सुपर जायंट्सच्या ८ षटकात २ बाद ४५ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

औरंगाबादचं नामांतर छत्रपती संभाजीनगर, आणि उस्मानाबादचे नामांतर धाराशिव करण्याच्या सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळल्या आहेत. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय आणि न्यायमूर्ती अरीफ डॉक्टर यांनी आज यावर निर्णय दिला. सरकारच्या या निर्णयात बेकायदेशीर असं काही **न**सल्याचं त्यांनी सांगितलं. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाधान व्यक्त केलं आहे. हा जनभावनेचा विजय असून, आज बाळासाहेब ठाकरे यांच स्वप्न खऱ्या अर्थानं पूर्ण झालं, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><>**

कर्नाटकातले जनता दल सेक्युलरचे आमदार एच . डी रेवण्णा यांना आज सात दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली. लैंगिक अत्याचार आणि

अपहरण याप्रकरणी त्यांना ४ मे रोजी अटक करून पोलीस कोठडीत ठेवलं होतं. त्यांच्या जामीन अर्जावरची सुनावणी उद्या होणार आहे.

**//<><><><><>//**